ज्ञान प्रबोधिनी प्रशाला ५१

# 51@51

आम्ही ५१!



## गोष्ट क्र. ४२

चित्रा केळकर – भावे

(इ. १०वी १९८६)

दि. २४ ऑक्टोबर २०२१

आता नोकरीसाठी परदेशात जाणे, flexible work hours या गोष्टी सवयीच्या झाल्या आहेत. पण नव्वदच्या दशकात, IT revolution मुळे सर्वांना – विशेषतः स्त्रियांना – पहिल्यांदाच एवढ्या मोठ्या प्रमाणात – कामाच्या निमित्ताने स्वतःच्या बळावर परदेशात जायची संधी मिळाली, जी बहुतेक वेळेला केवळ नवऱ्याच्या/वडिलांच्या नोकरीमुळे मिळत होती. त्यावेळेस अनेक आघाड्यांवर लढायला लागायचे, त्यामुळे ते इतके सोपे नव्हते. आत्ताच्या पिढीला ते जरा सुकर आहे, पण आत्ता वेगळी आव्हाने आहेत. इथे मुलांना वाढवणं, First Generation Indian Americans अशी पिढी जिला म्हणलं जातं, ती जोपासणं हा एक त्यातला खूप मोठा भाग होता. नवीन शतकाच्या दारी या सगळ्याचा समतोल सांभाळणं, ही अवघड जबाबदारी होती. नव्वदच्या दशकात मध्यमवर्गीय मुलींसाठी विविध क्षेत्रांमधील संधींची खूप दारं उघडली गेली. माझ्या पिढीच्या बऱ्याच स्त्रियांनी घर तसेच काम अशा दोन्ही आघाड्यांवर उत्तम काम केलं, आणि सोसलं देखील. मला कुटुंबाकडून मानसिक ताण आला नाही, हे माझं चांगलं नशीब. परंतु आधीच्या पिढीच्या काहीशा रूढीप्रिय अथवा महिलांसाठी ठराविक वेळांमध्येच, घराजवळ कामे असावीत अशा विचारांचे लोक आणि बदलत्या काळानुसार जुळवून घेणारी पिढी यातला ताण बऱ्याच जणींनी अनुभवला आहे. स्त्री–पुरुष समानतेचे वारे तेव्हा कार्यक्षेत्रामध्ये नुकतेच रुजू लागले होते. यासाठी माझ्या पिढीच्या महिलांनी शारीरिक आणि मानसिक मेहनत दुप्पट घेतली आहे. आजच्या मुलींना/स्त्रियांना त्यामानाने जास्त संधी उपलब्ध आहेत, पण त्याचबरोबर असंही वाटतं की आज त्यांना मानसिक ताण जास्त आहे.

## कागदाचे बोळे, लंगडीची मॅच आणि शनिवारचा डबा



भूषण आणि मी

प्रबोधिनीमध्ये मी हट्टाने आले, असं म्हणायला हरकत नाही. माझा भाऊ (भूषण केळकर, १९८५ बॅच) हा प्रशालेमध्ये होता. जेव्हा त्याला इथे प्रवेश मिळाला, तेव्हा मलासुद्धा इथेच यायचंय, असं ठरवून मी प्रवेश परीक्षा दिली. त्या वेळेस मला प्रशालेबद्दल अथवा प्रबोधिनीच्या इतर उपक्रमांबद्दल फारशी माहिती नव्हती, केवळ माझा भाऊ तिथे असल्याने मी जिद्दीने प्रवेश मिळवला. प्रवेश परीक्षेमध्ये एक प्रश्न होता – कागदाचे उपयोग लिहा. मी बरेच पर्याय त्यासाठी लिहीत गेले, आणि बघता–बघता ४९ उपयोग लिहून झाले. पण मी ठरवलं की आता ५० उपयोग पूर्ण करू. खूप विचार करून काही सुचलं नाही, आणि अचानक एक विचार डोक्यात येऊन मी लिहिलं – कागदाचे बोळे करून एकमेकांना मारण्यासाठी. घरी येऊन बाबांना हे सांगितल्यावर ते हसले, आणि म्हणाले कदाचित या उत्तरामुळेच प्रवेश मिळेल तुला. त्यानंतरची सहा वर्षं माझ्यासाठी अतिशय आनंददायी आणि संस्मरणीय आहेत. 'मातृभूमी हे मंदिर येथे स्थापियले पूजिले' हे शिकवणारी प्रबोधिनी माझ्यासाठी ज्ञानमंदिरच आहे. मी अजूनही शाळेच्या गमती–जमतींमध्ये रमते. आजही जेव्हा–जेव्हा पुण्यात येते तेव्हा प्रबोधिनीमध्ये येते, गिरीशरावांना भेटते, आणि जिने चढत–चढत अगदी कळसापर्यंत जाऊन येते.

माझी खेळांची आवड प्रबोधिनीमध्ये उत्तम प्रकारे जोपासली गेली. त्यापूर्वी चौथीपर्यंत मी खो–खो खेळायचे. पाचवीत आल्यावर इथे लंगडीसाठी मी कॅप्टन झाले होते. मला आठवतं, आम्ही पाचवीत असताना सासवडला सहलीला गेलो होतो. सातवीच्या मुली देखील त्या सहलीसाठी आल्या होत्या. त्यांच्याबरोबर आम्ही लंगडीची मॅच खेळलो आणि जिंकलो देखील! त्या दिवशी आमच्या वर्गातल्या सगळ्यांना सातवीच्या मुलींना हरवल्याचा आनंद झाला होता, आणि मला कर्णधार म्हणून विशेष आनंद झाला होता. त्यावेळी दलावर लंगडी, खो–खो, व्हॉलीबॉल, बेसबॉल अशा बऱ्याच खेळात मी हिरीरीने सहभाग घेतला. प्रबोधिनीत येण्यापूर्वी इथल्या वातावरणाबद्दल मला फारशी कल्पना नसली, तरी इथलं वेगळेपण मला आवडलं. त्या वयात गणवेश घालणे ही इतर शाळांमधली सक्तीची गोष्ट आपल्या शाळेत फक्त शनिवारी लागू आहे आणि गणवेश देखील वेगळा आहे, याचं अप्रूप होतं. दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे उपासना. उपासना मंदिर आणि तिथे होणारी उपासना याचा माझ्यावर मोठा प्रभाव होता. उपासनेपूर्वीचं मौन, तिथे वाजणारा तानपुरा, प्रत्यक्ष उपासना, तेथील वातावरण हे सर्व मला हवंहवंसं वाटायचं. बऱ्याचदा इतरांना पाचवीमध्ये आल्यावर काही गोष्टींचं, विशेषतः मौनाभ्यासाचं अप्रूप जरी असलं, तरी ते करणं अवघड जायचं. मला तसा अनुभव आला नाही, आणि मौन, उपासना यामध्ये मी सहज रमले.

माझ्या वर्गातल्या सगळ्याच मुलींशी लगेच मैत्री झाली होती. त्यातदेखील विशेष मैत्रीण म्हणजे अस्मिता केळकर. प्रवेश परीक्षेला आम्ही पुढे मागे बसलो होतो, आणि नंतर भेटल्यावर गट्टी झाली, आणि आम्ही एकत्रच असायचो. आडनाव–भगिनी पासून ते अगदी बहिणीसारखं नातं आमच्यात निर्माण झालं, आणि अजूनही आहे. वर्गात आम्हा दहा जणींचा ग्रुप होता. दर शनिवारी चिठ्ठ्या टाकून जिचं नाव येईल, तिच्याकडचा डबा आम्हा सगळ्यांसाठी असायचा. या चिठ्ठ्यांची इतकी गम्मत वाटायची, की सगळ्या उत्साहाने त्यात सहभागी होत, आणि जे समोर येईल, ते कुरकुर न करता खात असू. अनेक वर्षं हा उपक्रम चालू राहिला, आणि यानिमित्ताने आम्ही मैत्री, दुजाभाव न ठेवणे, समानता अशा मोठ्या गोष्टींपासून ते सर्व पदार्थ आवडीने खाणे इथपर्यंत बऱ्याच गोष्टी नकळत, सहज शिकत गेलो. प्रबोधिनीमधल्या अशा अनेक छोट्या–छोट्या गोष्टी आहेत, ज्यांचा खूप प्रभाव माझ्या जडण–घडणीवर झाला आणि त्यासाठी मी कायम ऋणी राहीन.



इ. ८वी मधील स्नेहसंमेलन



अस्मिता आणि मी

इतक्या वर्षांनंतर देखील प्रबोधिनीची ओढ आणि त्याबद्दलचं माझं प्रेम कमी झालेलं नाही, होणार नाही. माझी मुलं कधी-कधी त्यांच्या शाळेबद्दल काही ना काही तक्रार करत असतात, तेव्हा मी त्यांना म्हणते, की शाळा म्हणजे आनंद! माझ्या मुलांना परदेशात असल्याने प्रबोधिनीचे शिक्षण अनुभवता आले नाही, म्हणून मी त्यांना माझ्या प्रबोधिनीच्या आठवणी, तिथे मिळालेली शिकवण याबद्दल सांगत असते. प्रबोधिनीमधल्या विचारसरणीचा एक पालक म्हणून माझ्यावर वेगळा परिणाम झाला, आणि माझ्या मुलांच्या संगोपनात त्या विचारांचा मोठा वाटा आहे.


**कॉलेजचे मंतरलेले दिवस**

दहावी झाल्यानंतर मी कलचाचणी - Aptitude Test दिली होती. त्याच्यानुसार Commerce आणि Medical या दोन शाखा माझ्यासाठी पूरक आहेत असं सूचित केलं होतं. माझे वडील डॉक्टर आहेत, परंतु मला रक्त पाहिलं तरी त्रास होतो/भीती वाटते. त्यामुळे तेव्हाच ठरवलं की वाणिज्य शाखेत जायचं. यासाठी बरीच चौकशी केली, या क्षेत्रातील इतर संधी, शिक्षण याबद्दल माहिती मिळवली. तेव्हा CFS, CA, ICWA, CS हे पर्याय आघाडीवर होते. त्यापैकी CS (Company Secretary) हा पर्याय मला नकोसा वाटत होता, कारण माझ्या दृष्टीने त्यात कायद्याचा क्लिष्ट, रुक्ष भाग जास्ती येत होता, आणि एकूणच त्या क्षेत्राच्या कार्यपद्धतीमध्ये रस कमी वाटला. विचार करून मी Cost Accounting चा पर्याय निवडला, आणि मला माझ्या घराजवळच्या BMCC मध्ये प्रवेश मिळाला. कॉलेजमध्ये देखील धमाल केली. त्यावेळी, बॅडमिंटनपटू अर्चना देवधर माझी वर्गमैत्रीण होती. ती सतत वेगवेगळ्या स्पर्धांमध्ये खेळत असल्याने परीक्षेचा अभ्यास आणि खेळ याचा ताण यायचा. तिच्यासाठी मी माझ्या notes ची कार्बन कॉपी काढायचे. वर्गात बसलं, की वहीमध्ये कार्बन पेपर घालायचा, आणि नंतर ती पानं तिला नेऊन द्यायची. तेव्हा मला तिच्या यशात कुठेतरी खारीचा का होईना वाटा आहे असं वाटून समाधान वाटायचं. अर्थात, तिच्या कर्तृत्वापुढे हे काहीच नाही.

BMCC मध्ये इतर उपक्रमांमध्ये देखील मी सहभाग घेतला. नाटक, गॅदरिंग, आणि इतर अशा बऱ्याच उपक्रमात काम करायला मला आवडायचं. कॉलेजमध्ये 'झपूर्झा' हे व. पु. काळे यांच्या गोष्टीवर आधारित नाटक आम्ही केलं होतं. माझं घर कॉलेजपासून जवळ असल्याने नाटक किंवा इतर कशासाठीही लागणारं साहित्य आमच्या घरून पुरवलं जायचं. बऱ्याचदा मैत्रिणी राहायला देखील यायच्या. कॉलेज मधली पाच वर्षं या सगळ्यामध्ये भुरकन निघून गेली. तेव्हा मी वर्गात कायम पहिल्या पाचात येत राहिले. पहिल्या वर्षाच्या सुट्टीमध्ये मी नाशिक येथील Bhonsala Military School चा तीन आठवड्यांचा कोर्स देखील केला होता. सैन्याची शिस्त, गणवेश यांचं एक आकर्षण कायम माझ्या मनात होतं, आहे. ते तीन आठवडे मी समरसून प्रशिक्षण घेतलं आणि माझ्यासाठी अतिशय महत्त्वाचा अनुभव होता. कॉलेजमध्ये second language फ्रेंच घेतली होती. त्याच सुमारास Alliance Francaise de Pune चा फ्रेंच भाषेतील डिप्लोमा देखील केला. गमतीची गोष्ट अशी, की माझ्या फ्रेंचच्या वर्गात एक सैन्य अधिकारी- मेजर होता. त्याला अभ्यासासाठी म्हणून मी माझ्या notes दिल्या होत्या, आणि एकदा त्या परत घेण्यासाठी म्हणून मला NDA मध्ये जायची संधी मिळाली. तिथे गेल्यावर मी अगदी हरखून गेले होते आणि त्याला परिसर दाखवायला सांगितला होता. ते भारावून टाकणारं वातावरण माझा सैन्याबद्दलचा आदर द्विगुणित करणारं ठरलं. B.Com आणि ICWA या दोन्ही परीक्षा मी एकाच वर्षात उत्तीर्ण झाले. त्याकाळी, २% वगैरेच निकाल लागायचा. या दोन्ही परीक्षा साधारण सहा महिन्यांच्या अंतराने झाल्या. मला वाटतं, दोन्ही विषय पूरक असल्याने ते सहज

**Bhonsala Military School**





जमून गेलं. याचबरोबर टायपिंग आणि शॉर्टहॅन्ड याचे देखील कोर्सेस मी केले. आजकाल या दोन्ही गोष्टी वापरल्या जात नाहीत, पण माझ्या दृष्टीने ही अतिशय महत्त्वाची उपयुक्त कौशल्ये आहेत. अचूक आणि जलद टायपिंग चा उपयोग लॅपटॉप/मोबाइल वर देखील होतो, त्यासाठी अगदी टाईपरायटरच हवा असं नाही. शॉर्टहॅन्डचा उपयोग जलद लेखन, Micronotes, वेगळ्या लिपीमुळे वेगळा विचार, विशेषतः लिखाण करताना खूप उपयुक्त आहे. एका दृष्टीक्षेपात एका छोट्या टिपणाच्या आधारे संपूर्ण माहिती शब्दशः लिहिता येणं तसंच कमीत कमी शब्दांत जास्तीत जास्ती माहिती retain करणं हे कुठल्याही क्षेत्रासाठी फार महत्त्वाचं आहे.

ICWA च्या शिक्षण आणि कामाच्या स्वरूपाबद्दल बोलायचं झालं, तर Cost Accountant चं काम हे कुठल्याही उत्पादनासाठी किमतीचं प्रारूप (Cost Structure) ठरवणे हे असतं. कच्चा माल, प्रक्रिया, इतर Administrative Costs, Distribution, Transport/ Customs, BVa variable costs - Fuel etc, वेगवेगळे कर, उत्पादनाच्या वेळेस काही वाया जाणारा भाग अथवा तशी शक्यता विचारात घेणे, इतर सरकारी संरचना/कायदे यासारख्या अनेक बाबींचा अभ्यास करून, त्यानुसार किंमत–नफ्याचे गणित मांडून शेवटी ग्राहकांसाठी मूल्य ठरवणे हे काम Cost Accountant करतात. आता यामध्ये देखील नवनवीन संकल्पना आलेल्या आहेत. विशेषतः costing structure in Service Industry is very difficult. आजकाल Customer Acquisition, Marketing - especially Digital Marketing, Ads, SEO, Focus Group Feedback यासारखे अनेक मापक आले आहेत. या सगळ्यामुळे Costing ही अजूनच क्लिष्ट प्रक्रिया झाली आहे.

**SAP आणि अमेरिकेकडे प्रवास ...**

शिक्षणानंतर मी एका कंपनीमध्ये Management Trainee म्हणून कामाला सुरुवात केली. त्याच सुमारास माझं लग्न झालं, आणि मी अलिबागला राहायला गेले. तिथे माझ्या नवऱ्याचा बांधकाम व्यवसाय होता. तिथे Birla Consultancy कंपनीला SAP finance module वर काम करण्यासाठी ICWA झालेले उमेदवार हवे होते. माझ्या दृष्टीने ही सुवर्णसंधी होती. तेव्हा SAP येणाऱ्या तज्ज्ञांची खूप चलती होती, नवी लाट होती. परदेशवारीसाठी सर्वाधिक पसंती असलेला कोर्स असा त्याकाळी लौकिक होता. माझ्या दृष्टीने, अलिबागमध्ये राहून, माझ्या शिक्षणाचा उपयोग होईल अशी संधी मिळणं हीच पर्वणी होती. त्यामुळे मी तिथे SAP FICO (Finance Controlling) चं शिक्षण घेतलं, आणि तेव्हापासून SAP क्षेत्रात काम करत आहे. SAP ERP हे एक मोठं Integrated Software आहे. मोठ्या कंपन्यांमध्ये/प्रणालीमध्ये त्याचा खूप चांगला उपयोग होतो – मग ते production streamlining, costing, accounting यासारख्या अनेक business operations and customer relation solutions यासाठी वापरलं जातं.

SAP Finance चं प्रशिक्षण घेतल्यावर मी काही काळ अलिबागमध्ये काम केलं, आणि नंतर हैदराबादमध्ये देखील काम केलं. प्रशिक्षणानंतर सुमारे दीड वर्षांनी, १९९७ च्या सुमारास मी अमेरिकेमध्ये work visa घेऊन गेले. बरीच वर्षं मी SAP मध्ये काम केलं, सध्या मी Benjamin Moore कंपनीत Senior Business Analyst म्हणून IT मध्ये काम करते. सध्याचं कामाचं स्वरूप हे User-Interaction, Problem Resolution, Solution- Architect या सदरात येतं. Currently, I am working more on the accounting functional side of it than costing. माझ्या कामाच्या बाबतीत मला आवडणारी गोष्ट म्हणजे highly integrated platforms. ही प्रणाली इतक्या काटेकोरपणे बांधली गेली आहे, आणि यात नियम/कायदे यांचा सुंदर मेळ आहे की Adjustment Entries साठी फारसा वावच नाहीये. त्यामुळेच, जेव्हा कुठल्याही अडचणी येतात, त्यावर adjustment ची तात्पुरती मलमपट्टी पुरत नाही. सखोल अभ्यास करून, आपल्या अडचणीचा एखाद्या मोठ्या एकत्र जोडलेल्या प्रणालीमध्ये काय परिणाम झाला आहे किंवा त्यावरच्या उपायाचे काय पडसाद उमटतील, याचा सर्वतोपरी विचार करावा लागतो. **In IT, we live in a world of bugs and fixes. Solution goes so much deeper than that. त्यासाठी सर्वंकष विचार करण्याची क्षमता हवी.**



कामाचा भाग म्हणून Functional Production Support मध्ये देखील मी काम करते. माझ्या दृष्टीने हे आव्हानात्मक काम आहे कारण त्यांमध्ये संयम, आकलन आणि वेळेत उत्तर देणे या महत्त्वाच्या गोष्टी असतात आणि म्हणूनच मी ते आनंदाने करते. इथे तुमचा संपर्क थेट Client/User सोबत असतो, आणि Finance मधलं काम असल्याने सारवासारव करणे, ते ही अगदी महिनाअखेरीस हे अवघड आहे. परंतु, कामाचा हा भाग देखील माझ्यासाठी आनंदाचे आहे, आणि अभिमानाने मला सांगावंसं वाटतं,की आत्तापर्यंत जे issues/User

Cases माझ्याकडे आले, त्याचं निराकरण मी वेळेत आणि उत्तम प्रकारे करू शकले. एवढंच नाही, तर आजही असा कुठला प्रश्न आला, की जो सहजी सुटत नाहीये, तर त्यासाठी माझ्या ऑफिसमध्ये माझे बॉस किंवा इतर पदाधिकारी बिनदिक्कत माझं नाव पुढे करतात. त्यांचा हा विश्वास माझ्यासाठी अमूल्य आहे.



मला आठवतं, १९९७ मध्ये जेव्हा व्हिसाच्या मुलाखतीसाठी मी दूतावासात गेले होते, तेव्हा त्यांनी मला विचारलं होतं, की ही तुमची SAP System आमच्या consulate मध्ये वापरता येईल का, आणि कशी? माझ्या कामाच्या बाबतीत असा application-oriented प्रश्न ऐकून मी थोडी चकित झाले, आणि मला आनंद देखील झाला, कारण त्याकाळी, आणि आत्ता देखील, व्हिसाच्या मुलाखतीत Detailed Technical प्रश्न फारसे विचारले जात नाहीत. तेव्हा मला प्रबोधिनीच्या वातावरणाची, अभ्यास पद्धतीची तीव्रतेने आठवण आली होती आणि अभिमान देखील वाटला होता, की प्रबोधिनीमधल्या शिक्षणामुळे आणि प्रोत्साहनामुळे आज मी अशा पद्धतीचे प्रश्न सहज सोडवू शकते. मी त्या मुलाखतीमध्ये त्यांना ती प्रणाली आणि त्याचे फायदे व्यवस्थित समजावू शकले, याची पायाभरणी प्रबोधिनीने केली आहे.

**Y2K Crisis**

याचाच प्रत्यय मला अजून एकदा आला होता. १९९९ साली – Y2K Crisis च्या वेळेस. १९९९ साली, सर्व तत्कालीन संगणक प्रणालींमध्ये वर्षासाठी दोन आकडी field वापरलं जात होतं, जिथे त्या वर्षाचे शेवटचे दोन आकडे येत. त्यामुळे, सन २०००, म्हणजेच Y2K च्या सुरुवातीला, १ जानेवारी २००० रोजी, त्या Year Code साठी ०० हा आकडा आला असता, जो बऱ्याच ठिकाणी चालला नसता. त्यामुळे, जगभरातील संगणक प्रणालींमध्ये यासाठी फेरबदल करण्यात आले जेणेकरून चार आकडी वर्ष वापरता येईल. १९९९ मध्ये SAP च्या प्रणालीमध्ये हे बदल करणे आणि त्याचं testing करणे यामध्ये माझा सहभाग होता. त्या निमित्ताने अक्षरशः संपूर्ण प्रणालीमध्ये झाडून शोध घ्यावा लागला की कुठे-कुठे Year Code आहे. तेव्हा Core Programming जर्मन भाषेत असल्याने, जरी इंग्रजी रूपांतर आमच्याकडे असलं, तरी सगळे फेरबदल कष्टाचे होते. हे आव्हान पेलताना देखील मजा आली. आता कधी-कधी वाटतं, की सध्या जर चार आकडी वर्ष वापरली असतील, आणि ९९९९ सालापर्यंत जी कुठली प्रणाली असेल, त्यावेळेस Y10K चा मुद्दा येईल का? किंवा अगदी नजीकच्या काळात Y2038 सारखा प्रश्न आ वासून उभा आहे ज्या अंतर्गत कालमापनासाठी जी seconds पद्धत वापरली जाते, ती ३२ आकडी असल्याने १९ जानेवारी २०३८ सालापर्यंतच ती पद्धती बऱ्याच ठिकाणी वापरता येईल. यासाठी अजूनतरी कुठलं ठोस, सर्वांगीण solution माझ्या माहितीत नाही.

अजून एक सांगण्यासारखी गोष्ट म्हणजे हे Y2K चं काम करताना २००० सालापर्यंत मी न्यू यॉर्कमध्ये World Trade Centre च्या साठाव्या मजल्यावरच्या ऑफिसमध्ये काम करायचे. त्यानंतर माझं ऑफिस बदललं, आणि दुर्दैवाने २००१ साली ९/११ च्या हल्ल्यात World Trade Centre उध्वस्त झालं. त्यावेळेस ते सगळं पाहताना राहून-राहून मनात विचार येत होते, की अरे बापरे, काही महिन्यांपूर्वी पर्यंत आपण इथे काम करत होतो, रोज इथे ऑफिसला जायचो. It was a shock, watching it all unfold.

माझ्या कामामुळे, विशेषतः finance क्षेत्रात असल्यामुळे मला कायम विद्यार्थीदशेत राहावं लागतं. इथे कायदे/नियम हे सारखे बदलतात, नवनवीन गोष्टी, technology येत राहते, म्हणून up-to-date राहावंच लागतं. हे सतत नवनवीन शिकणं देखील मला आवडतं. Technological Advances समजून घेण्यासाठी मी ऑफिसमधल्या सगळ्या लहान मुला-मुलींकडे – म्हणजे माझ्या दृष्टीने लहानच ती, माझ्या मुलांच्या वयाची असल्याने – जाऊन त्यांना सांगते, की मला काहीही येत नाही असं समजा, आणि शिकवा. ते सगळे उत्साहाने मला सांगतात, शिकवतात आणि त्यामुळे ज्ञानार्जन देखील मजेत होतं. गेले दोन वर्ष – financial year च्या दृष्टीने दोन वर्षं – कोरोनाच्या संकटामुळे माझ्या वैयक्तिक कामावर फारसा परिणाम झाला नसला, तरी बरेच घटक आहेत, ज्याचा अप्रत्यक्ष परिणाम प्रणालीवर झाला. त्यामुळे, हे असं संकट – विशेषतः जिथे production haults येऊ शकतात, business users/transactions वर परिणाम होऊ शकतो, अशा प्रश्नांवर उत्तर शोधण्याचं काम सध्या सुरू आहे. मी आणि माझी टीम याचा सखोल अभ्यास करून system-wide solution साठी प्रयत्न करत आहोत.

**गुरुर्ब्रह्मा गुरुर्विष्णू**

गुरु म्हणाला की पहिलं नाव माझ्या डोळ्यासमोर येतं, ते माझ्या आईचं. आणि दुसरं माझ्या सासूबाईंचं. माझ्या आयुष्याची पहिली २२ वर्षं आईचे संस्कार, आणि त्यानंतरची २७ वर्षं सासूबाईंचे संस्कार याचा माझ्या आयुष्यात खूप मोठा वाटा आहे. लोकांशी कसं बोलावं-वागावं, नाती कशी जपावीत, time management, priority management हे मी त्या दोघींकडून शिकले. मी जेव्हा १९९७ मध्ये अमेरिकेत गेले होते, तेव्हा एकटीच गेले होते, नवरा आणि मुलगी त्यानंतर आले. तेव्हा एक विचित्र भीती मनात असायची, की आपली ३-४ वर्षाची लहानगी मुलगी आपल्याला विसरणार तर नाही ना.. तेव्हा १९९८ ला आजकाल सारखे video calls, frequent audio calls, e-mail चा वापर एवढा नव्हता, whatsapp/facebook नव्हतं. पण माझ्या सासूबाईंनी आणि आईनी माझ्या मुलीला माझी कमतरता भासू दिली नाही. माझा फोटो तिला दाखवून माझ्या गोष्टी सांगायच्या त्या. त्या दोघींच्या आणि इतर कुटुंबियांच्या खंबीर आधारानेच मी हे करू शकले. प्रबोधिनीमध्ये नलूताई उजळंबकर यांची जरब, त्यांची शिस्त याचा प्रभाव पडला. आणि दुसऱ्या हेमाताई डोळे, अगदी विरुद्ध स्वभाव, आणि संस्कृतमध्ये ओघवत्या वाणीने बोलायला लागल्या, की बाकी सगळ्याचा विसर पडायचा. **शीलाताई आम्हाला पाचवीमध्ये इंग्लिश शिकवायला होत्या. त्यावेळेस अलका टॉकीजला Sound of Music लागला होता, आणि त्या विशेष परवानगी काढून आम्हाला तो सिनेमा दाखवायला घेऊन गेल्या. Interactive Learning चा एक सहज सोपा धडा त्या दिवशी आम्ही शिकलो.**

**खंबीर पाठबळ**



**सासू-सासरे**



**आई-वडील**



प्रबोधिनीनी मला आयुष्यातली एक खूप महत्त्वाची गोष्ट शिकवली आणि ती म्हणजे दिलेली वेळ पाळणे! प्रबोधिनीतले सगळे कार्यक्रम वेळेत सुरू व्हायचे आणि वेळेत संपायचे सुद्धा! एवढी अचूक आखणी असायची. तीच सवय मला अमेरिकेत आल्यावर पण लागली आहे. आणि म्हणून इतर लोकं जेंव्हा Indian Standard Time असे सांगून उशीर करतात तेव्हा माझी खूपच चिडचिड होते. Time is money ही नुसती म्हण म्हणून लक्षात न ठेवता जर ती आचरणात आणली तर जास्ती चांगलं होईल हाच विचार प्रत्येक वेळी मनात येतो.

सुदैवाने माझी दोन्ही मुले - ईशा आणि अनीश आणि माझा नवरा अतुलपण वेळ पाळण्यात एकदम पटाईत आहेत आणि त्यासाठी मला त्यांचा खूप अभिमान वाटतो.

**यत्र नार्यस्तु पूज्यंते**

आता नोकरीसाठी परदेशात जाणे, flexible work hours या गोष्टी सवयीच्या झाल्या आहेत, पण नव्वदच्या दशकात, IT revolution मुळे सर्वांना - विशेषतः स्त्रियांना - पहिल्यांदाच एवढ्या मोठ्या प्रमाणात - कामाच्या निमित्ताने स्वतःच्या बळावर परदेशात राहायची संधी मिळाली, जी बहुतेक वेळेला केवळ नवऱ्याच्या/वडिलांच्या नोकरीमुळे मिळत होती. त्यावेळेस अनेक आघाड्यांवर लढायला लागायचे, त्यामुळे ते इतके सोपे नव्हते. आत्ताच्या पिढीला ते जरा सुकर आहे, पण आत्ता वेगळी आव्हाने आहेत. इथे मुलांना वाढवणं, First Generation Indian Americans अशी पिढी जिला म्हणलं जातं, ती जोपासणं हा एक त्यातला खूप मोठा भाग होता. नवीन शतकाच्या दारी या सगळ्याचा समतोल सांभाळणं, ही अवघड जबाबदारी होती. नव्वदच्या दशकात मध्यमवर्गीय मुलींसाठी विविध क्षेत्रांमधील संधींची खूप दारं उघडली गेली. माझ्या

पिढीच्या बऱ्याच स्त्रियांनी घर तसेच काम अशा दोन्ही आघाड्यांवर उत्तम काम केलं, आणि सोसलं देखील. मला कुटुंबाकडून मानसिक ताण आला नाही, हे माझं चांगलं नशीब. परंतु आधीच्या पिढीच्या काहीशा रूढीप्रिय अथवा महिलांसाठी ठराविक वेळांमध्येच, घराजवळ कामे असावीत अशा विचारांची लोकं आणि बदलत्या काळानुसार जुळवून घेणारी पिढी यातला ताण बऱ्याच जणींनी अनुभवला आहे. स्त्री-पुरुष समानतेचे वारे तेव्हा कार्यक्षेत्रामध्ये नुकतेच रुजू लागले होते. यासाठी माझ्या पिढीच्या बायकांनी शारीरिक आणि मानसिक मेहनत दुप्पट घेतली आहे. आजच्या मुली/बायका यांना त्यामानाने जास्ती संधी उपलब्ध आहेत, पण त्याचबरोबर असंही वाटतं की आज त्यांना मानसिक ताण जास्ती आहे.

काही वर्षांपूर्वी सुचेतताई भगत हिने मला एक सुखद धक्का दिला. तिने मला फोन करून विचारलं - युवती विभाग Abroad हा उपक्रम सुरू करत आहोत, तो lead करशील का? प्रबोधिनीच्या विविध वयोगटाच्या युवती ज्या इथे आहेत/येतील त्यांच्याशी संवाद साधणे, त्यांना मार्गदर्शन करणे, त्यांच्याकडून शिकणे, विविध उपक्रम राबवणे असं काम आम्ही या अंतर्गत करतो. आत्तापर्यंत ३/४ sessions झाली आहेत, नवीन आठवणींना उजाळा मिळाला. शिक्षक दिनाच्या निमित्ताने अनुराधाताई आणि विद्याताईंना बोलावून त्यांचे अनुभव ऐकले. बागेश्रीताई पोंक्षेचं अनुभवकथन देखील ठेवलं होतं. सामाजिक कार्याचा आवाका काय याची या सगळ्यातून जाणीव झाली. यावर्षी गणेशोत्सवाच्या निमित्ताने आम्ही घरच्या घरी का होईना, पण बरच्या केल्या. यानिमित्ताने परत बरच्या शिकलो, आणि गणेशोत्सव नव्याने अनुभवला. आता नवीन पिढीला मार्गदर्शन म्हणून जेव्हा आम्ही इथे आलो तेव्हाचं अनुभवकथन, शिक्षण/कामाच्या निमित्ताने इथे येताना काय-काय करावं लागतं याचं मार्गदर्शन देण्याची योजना करत आहोत.

युवती विभाग Abroad हे एक मुक्त व्यासपीठ आहे. इथे सर्व वयाच्या युवती येऊ शकतात, बोलू शकतात, उपक्रम करू शकतात. कुठलाही विषय इथे वर्ज्य नाही. नवीन उपक्रम सुरू करायला वयाचं बंधन नाहीये. याची मूळ संकल्पना म्हणजे - कॉलेज कट्ट्यासारखा हा एक मोकळपणाने व्यक्त होण्याचा platform आहे. Career Guidance पासून ते अगदी वैयक्तिक प्रश्न - उदाहरणार्थ Harmonal Issues सारख्या काहीशा Taboo विषयांपर्यंत सर्व विषय हाताळायचा आमचा मानस आहे.

**आनंदछंद**

प्रबोधिनीमध्ये मी वाद्य पथकात सहभागी झाले नव्हते. परंतु इथे आल्यावर New Jersey मध्ये जल्लोष पथकाची ओळख झाली. मला तालवाद्यांचा सोस आहे. जल्लोषच्या सुरुवातीला आम्ही पुण्याहून सर्व साहित्य - ढोल, पानं, अबदागिरी असं मागवलेलं होतं. जल्लोष पथकात सुरुवातीला मी Assistant Treasurer म्हणून काम सुरू केले. Finance शी निगडित जबाबदाऱ्या घेतल्या. अगदी घरचं लग्न असल्यासारखा इतर उपक्रमांतही सहभाग घेतला. विविध सांस्कृतिक उपक्रमांमध्ये ढोल वाजवला. दोन वर्षे मी जल्लोषची अध्यक्ष देखील होते. ज्याप्रमाणे पांडवांनी त्यांची शस्त्र शमीच्या ढोलीत ठेवली, त्याप्रमाणे Pandemic च्या काळात आम्ही सगळ्यांनी आपली वाद्यं storage मध्ये ठेवली होती. पण या वर्षी ३/४ कार्यक्रम करता आले. Rutgers University मध्ये आम्ही ढोल-ताशा पथकाचा कार्यक्रम ठेवला. तिथली सगळी मुलं ढोलाच्या तालावर रमली होती. आम्ही जितकं वाजवू, तितकं उत्साहाने त्यांनी आम्हाला साथ दिली. जल्लोष बरोबर मी अनेक मिरवणुका केल्या आहेत. New York City मध्ये Indian Independence Day Parade मध्ये ढोल वाजवायची संधी देखील आमच्या पथकाला मिळाली. अगदी तिथले पोलीससुद्धा त्या तालावर थिरकले. मुख्यतः New Jersey मध्येच आम्ही कार्यक्रम करतो. जल्लोष ही एक NGO असल्याने, प्रत्येक कार्यक्रमाच्या वेळेस आम्ही funds गोळा करतो, आणि वर्षाखेरीस कुठल्या चांगल्या संस्थेला सार्वमताने ती रक्कम मदत म्हणून देतो. आत्तापर्यंत एकल विद्यालय, ब्रह्मपुरीच्या आश्रमशाळेसाठी Computer Lab, मुंबईमधील घरकुल येथे गतिमंद मुलांच्या विकासासाठी मदत, विवेकानंद विद्यापीठ, न्यू जर्सी यांना मदत केली आहे. दरवर्षी आम्ही आमच्या volunteers कडून संस्थांची नावं घेतो, त्यांना संपर्क करतो, त्यांच्या कामाची माहिती घेतो. ज्या संस्थांना








आम्ही मदत करू शकतो, त्यांना ती देतो, आणि त्यांच्याकडून आमच्या रकमेच्या विनियोगाचे वृत्त देखील मागवतो. केलेली मदत सत्कारणी लागावी, हाच या मागचा उद्देश आहे.

सामाजिक कार्याची आवड ही प्रबोधिनीनेच माझ्या मनात बिंबवली आहे. समाजहितासाठी जे जमेल, जसे जमेल ते करणे हे बाळकडू घरून आणि प्रबोधिनीतून मिळाले. American Cancer Society साठी मी fundraising चं काम केलं. कर्करोगासाठी संशोधन आणि त्याची जागरूकता वाढावी यासाठी ही संस्था प्रयत्नशील आहे. तसंच इथे न्यू जर्सीमध्ये विवेकानंद विद्यापीठासाठी देखील मी काम करते. मुलांचे संगोपन, विवेकानंदांचे संस्कार जोपासणे, अध्यात्मिक अभ्यास अशा विषयांवर इथे काम केलं जातं. इथे रहात असताना इथली संस्कृती अनुभवणे आणि त्याबरोबरच आपली संस्कृती जोपासणे यासाठी ही संस्था प्रयत्नशील आहे. मुलांना हिंदू संस्कृतीची नीट ओळख व्हावी, त्यांच्या अमेरिकन आयुष्यामध्ये त्यामुळे कमीत कमी गोंधळ व्हावा, यासाठी पालक आणि मुलं या दोघांना मार्गदर्शन करते. दोन्ही संस्कृतींमधील फरक, तसंच सारखेपणा याचा अभ्यास करून, ते समजून घेतलं जातं. मुख्य भर character building आणि spiritual development यावर आहे.

**पंढरीची वारी जयाचिये कुळी, त्याची पायधुळी लागो मज।**

मी मूर्तिपूजेवर फारसा विश्वास ठेवत नाही, माझा कल अध्यात्मिक वृत्तीकडे जास्ती आहे. लहानपणापासून गणपती, विठ्ठल, देवी यांना मूर्तीरूपात बघण्याची सवय आहे, सण साजरे करताना मूर्ती समोर असते, त्यामुळे तो एक धागा मनात आहे. परंतु, सगुणसाकारापेक्षा निर्गुण निराकारात मला जास्त रस वाटतो. प्रबोधिनीसारखी उपासना मी नाही करत, पण इतर meditation करते. घरात देवघर असेल, तर त्यात देवांबरोबर अखंड भारतमातेची/ मातृभूमीची प्रतिमा असावी, असं मला वाटतं. माणसांमध्ये - त्यांच्या कार्यात, वृत्तीत देव बघावा असा माझा प्रयत्न असतो.

यानिमित्ताने २०१४ साली मी संपूर्ण वारी पायी चालत केली. प्रबोधिनीत असताना वारीचा थोडा फार अनुभव होता, पण यावेळी ठरवून आळंदी ते पंढरपूर १७ दिवसांचा २५६ किलोमीटर चा प्रवास केला. देशमुख दिंडीबरोबर संपूर्ण वारी पायी चालत पूर्ण केली. योग हा होता, की पालखीला लागून अगदी चौथ्या क्रमांकाला आमची दिंडी होती, त्यामुळे पालखीचं, तिथल्या वारकऱ्यांचं मनसोक्त दर्शन घेता आलं, त्यांचा सहवास लाभला. माणसांमधला देव तिथे मला अगदी जवळून बघता आला. माझ्या बरोबरच्या मैत्रिणीचा चालता-चालता पाय मुरगळला, म्हणून आम्ही एका झाडाशी बसलो होतो, आणि अचानक एक माणूस आला, आणि त्याने अमृतांजनची बाटली काढून समोर धरली. कोण कुठला वारकरी, पण मदतीला धावून आला. नंतर काही वारीमध्ये तो दिसला नाही, पण प्रसंग लक्षात राहिला. असे अनेक छोटे-छोटे प्रसंग आले, ज्यामुळे माणसातील चांगुलपणाची, देवत्वाची साक्ष पटली. निरपेक्ष सेवाभाव तिथे अनुभवला. मी आणि माझी मैत्रीण अमेरिकेहून तिथे गेल्याने तिथल्या काही लोकांना आमचं अप्रूप वाटायचं. आम्ही रोज दिंडीबरोबर सगळ्यांसारखी कामं करायचो, स्वयंपाकात जमेल तशी मदत करायचो, तेव्हा त्यांना आश्चर्य वाटायचं. आम्ही त्यांना सांगायचो, आम्ही इथल्याच आहोत मूळच्या, गेली काही वर्षं तिथे राहतोय फक्त. पिंड इथलाच आहे. वारीने ही समानता दाखवली. वारीच्या दरम्यान मला माझ्या मुलीचा फोन आला, आणि तिने कळवलं, की तिला White House मध्ये Internship ची संधी मिळाली. माझ्यासाठी ती बातमी म्हणजे दुधात साखरच जणू! वारीचं फळ हे अशा प्रकारे ध्यानीमनी नसताना मिळालं, असं वाटलं.






वारीमध्ये मी रात्री दैनंदिनी लिहायचे. या सवयीच्या मागेदेखील प्रबोधिनीची शिस्त आहे. त्यात प्रत्येक दिवसाचे अनुभव लिहायचो. दिंडीतल्या लोकांना त्याचं कुतूहल असायचं, की काय लिहितात या दोघी रोज. त्या नोंदी माझ्यासाठी मौल्यवान आहेत. आजही ती दैनंदिनी वाचली की ते वारीचा चित्र तस्संच डोळ्यांसमोर उभं राहतं. सर्वांनी एकदा तरी वारी करावी असा माझा सल्ला आहे. त्या अनुभवावर एक छोटी कविता देखील केली –

पहाटे पहाटे स्वप्ने पडले २०१४ च्या जानेवारी ।
विठू माउली सांगून गेली, यावर्षी जमव पंढरपूरची वारी ।।
आई-बाबांच्या मदतीने, मनावर मी घेतले ।
वारीमध्ये मला अचानक सात सूर गवसले ।।
पांडुरंग दर्शनासाठी आतुर, न दिसे गोंधळ,
न दिसे पोलीस, न लागे काठी ।
स्वयंशिस्त हाच एक मंत्र, ज्याच्या त्याच्या गाठी ।।
चौथीच्या पुस्तकानंतर बघितली समानता मी इथे पदोपदी ।
सान – थोर राव-रंक, हिंदू-मुस्लिम सगळे फक्त वारकरी ।।
मानसिक, शारीरिक, अध्यात्मिक तप असे जरी वारी ।
समाधान रूपी पुंडलिक उमले प्रत्येक वारकरी मनी ।।
एकमेका साह्य करुनी, अवघे सुपंथ चालती ।
सेवाभाव दाटे मनी, शब्द उच्चारता माउली ।।
कोणाबद्दल न वाटे कोणाला हेवादावा दिन ते सात दशोत्तरी ।
सद्भावना अन् प्रेमभावच अनुभवला मी नेहमी ।।
पायी प्रवास कष्टदायक अन् खडतर, आळंदी ते पंढरपुरी ।
सहनशीलताच मग येई कामी, करण्या पूर्ण वारी ।।
जाहले संपूर्ण शरणागत, पांडुरंगाच्या चरणी ।
भाग गेला शीण गेला, दिसता नामदेवाची पायरी ।।
सप्तसुरांनी या साऱ्या वाटचाल झाली माझी सुरीली ।
विठूमाऊलीच्या कृपाप्रसादे मला करता आली पंढरीची वारी ।।






**वानप्रस्थाश्रम**

आता पन्नाशीनंतर वानप्रस्थाश्रमाच्या मार्गावर आहे. माझी मुलं मोठी झाली आहेत, स्वतंत्र झाली आहेत. दोन उत्तम सुजाण नागरिक घडवण्याची माझी जबाबदारी मी पार पडली आहे. बऱ्याच सांसारीक जबाबदाऱ्या देखील पार पडल्या आहेत. काही वर्षांपूर्वीपर्यंत मुलं थोडी फार अवलंबून होती, पण आता ती दोघं झेप घेतायत. ते जिथे जातील, तिथे त्यांना प्रोत्साहन देणं, आवश्यक असेल तिथे सल्ला देणं, मदत करणं, याउपर इतर काही केलं तर ते त्यांच्या आयुष्यात ढवळाढवळ करण्यासारखं होईल, त्यामुळे ते नाही.

आता हळूहळू इतर सामाजिक कार्यांमध्ये सहभाग वाढवायचा आहे. माझ्या काही कल्पना/प्रकल्प राबवून पाहायचे आहेत. काही वर्षांपूर्वी भारतात आले असताना आनंदवनात जायचा योग आला, आणि डॉ. विकास आमटेंना भेटायचं भाग्य लाभलं. तिथलं काम पाहून, त्यांचं बोलणं ऐकून मला वाटलं, की निवृत्तीनंतर इथेच यावं, हे काम वाढवावं – त्यावर ते म्हणाले, या कामाची सुरुवात मुळात समाजाने बहिष्कृत केलेल्या लोकांना स्वतःचं जीवन उभं करता यावं म्हणून झाली आहे. ही संस्था मोठी होणं हा एकार्थाने आपला पराभव आहे. याचा एक अर्थ असा की अजूनही समाजात कुठेतरी दुजाभाव आहे. या कामाचा अंत एकच – असा समाज घडवणे ज्यामध्ये आनंदवन सारख्या प्रकल्पाची गरज भासू नये. All Inclusive Development should be the future.

मला प्रवासाची आवड आहे. निसर्गामध्ये रममाण व्हायला मला आवडतं. जंगल, दऱ्या, glaciers, volcanos या अवाढव्य निसर्गाच्या पसाऱ्यापुढे आपण किती खुजे आहोत याची जाणीव मला होत राहते. साहसी खेळांबद्दल मला कुतूहल आहे. Rafting, bungee jumping असं बरंच काही आता करायचं आहे.

आत्ताच्या प्रबोधकांना मी सांगेन की एकदा तरी वारी करा, have that experience, it will help you a lot. आणि

गणपतीचा आदर्श घ्या. थोडं विसंगत वाटेल, कारण मी आधी सांगितल्याप्रमाणे मूर्तिपूजेवर माझा फारसा विश्वास नाही, परंतु गणपती बद्दल मला आत्मीयता आहे. आणि सांगायचं कारण हे – की गणपतीची मूर्ती नजरेसमोर आणली, तर जाणवेल की डोळे छान छोटे असतात – त्यासारखी सूक्ष्मदृष्टी असू दे, मोठे कान – ऐकण्याची कला विकसित करा, लंबोदर – यशाची, उत्तमतेची भूक ठेवा. Be Wise about your finances. Pandemic ने शिकवलेला हा एक महत्त्वाचा धडा आहे. या pandemic नंतर भारतात येऊन प्रबोधिनीच्या कार्यकर्त्यांना भेटणे आणि नवनवीन उपक्रम पाहणे यासाठी मी आतुर आहे.

**माझे साहस व भटकंती**





















## RAPID FIRE

१. आवडते पुस्तक - श्रीमान योगी

२. आवडता चित्रपट - शोले

३. तुमचा छंद - गाणी ऐकणं

४. लक्षात राहिलेला शिक्षक - नलूताई उजळंबकर, हेमाताई डोळे

५. लक्षात राहिलेला प्रबोधिनीचा उपक्रम - सासवड सहल, शिवापूर शिबिर

६. पहिली प्रतिक्रिया

- ढोल - जल्लोष
- वारी - संतवाङ्मय, शरणागती
- SAP - यासम हेच
- ज्ञान प्रबोधिनी - ज्ञानमंदिर
- Spirituality - मानसिक बळ



**नलूताई गुजराथी**





**हेमाताई डोळे**

**चित्रा केळकर - भावे**
**201-414-0299**
**cbhave@yahoo.com**

**मुलाखत - अपूर्वा इनामदार, चिन्मयी खरे** **शब्दांकन - अपूर्वा इनामदार**

**संपादन - मानसी बोडस, पल्लवी गोखले - नगरकर**

**आरेखन व मांडणी - निशिगंधा खळदकर**

Write to us : jpp51_51@jnanaprabodhini.org